**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १४/१०/२०२५ ( मंगळवार )**

---

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे विविध स्तरावर जनजागृती मोहीम

केंद्रिय गृहमंत्रालय आणि I4C यांनी देशव्यापी उपक्रमाचा एक भाग म्हणुन ऑक्टोबर २०२५ हा महिना सायबर जनजागृती महिना म्हणुन घोषित केला असून त्या अनुषंगाने नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दला तर्फे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर, ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात सायबर पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि पोलीस स्टेशनच्या वतीने सायबर जनजागृती मोहिम राबविण्यांत येत आहे. सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमे अंतर्गत खालीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले आहे.

दिनांक ०५/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मंडवधरे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कन्हान यांनी धर्मराज हायस्कुल कन्हान येथील विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

दिनांक ०७/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्री प्रशांत मिसाळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वेलतुर यांनी जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा,पचखेडी येथे तसेच पोउपनि पल्लवी कळमकर यांनी जिल्हा परीषद शाळा, शिवणी येथील विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

दिनांक १३/१०/२०२५ रोजी एन.सी.सी. कॅम्प हेटी, सुरला ता.सावनेर येथील विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण चे सहा. पोलीस

निरीक्षक प्राची राजुरकर आणि मनापोशि संगिता गांवडे यांनी सायबर सुरक्षे बाबत जनजागृती केली.

दिनांक १४/१०/२०२५ रोजी खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

१) पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन देवलापार यांनी पोलीस पाटील यांना तसेच पोउपनि वर्षा गायकवाड यांनी जिल्हा परीषद मागसवर्गिय मुला – मुलींचे वसतीगृह येथील विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

२) पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्री तुषार चव्हाण प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी श्रीराम आदीवासी आश्रम शाळा, खापा घुडन येथील विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

३) पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक श्री यांनी पोलीस भरती तयारी करणाऱ्या विदयार्थ्यी आणि विदयार्थ्यीनींना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. सोशल मिडीया जाहीरातीवर लगेच विश्वास ठेवु नका.**

**२. अनोळखी मो.क्रं वरून आलेल्या बॅक /पोलीस /इतर शासकिय अधिकारी यांचे फोन किंवा मॅसेज बाबत पडताळणी करा.**

**३. मोबाईल मधील ॲप नेहमी प्ले स्टोअर किंवा अधिकृत संकेतस्थळा वरूनच डाउनलोड करावे.**

**४. सोशल मिडीयांवर येणाऱ्या अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट पासुन सावधान राहा.**

**५. कोणत्याही आमिषाला बळी पडु नका सायबर गुन्हेगाराच्या जाळयात अडकु नका.**


vivo Y28s
Rinku Mane Oct 13, 2025, 10:25




व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय





## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक १३/१०/२०२५ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वाकेश्वर येथील नदी पात्रातुन ट्रक्टरने अवैध रेतीचे उत्खनन करून रेतीची वाहतुक वाकेश्वर सुकळी रोडने होत आहे . मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सुकळी शेत शिवार येथे नाकाबंदी केली असता स्वराज कंपनीचा ७४२ एक्स टी ट्रक्टर एम.एच. ३६ ए.जी. ३६५३ आणि ट्रॉली क्रमांक एम.एच. ३६ ए.जी ५२२३ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आणि मालक आरोपी नामे लोकेश रमेश पुडके, वय २८ वर्ष, रा. वाकेश्वर मौदा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रक्टर एम.एच. ३६ ए.जी. ३६५३ त्याला जोडलेली ट्रॉली क्रमांक एम.एच. ३६ ए.जी ५२२३ किमती ५,००,००० /—रूपये व २) १ ब्रास रेती किंमती ६,०००/— रूपये आणि असा एकुण ५,०६,०००/रूपयांचा माल जप्त करण्यात आला.

नमुद आरोपीविरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

दिनांक १३/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

आरोपी नामे क्रमांक १) नत्थुजी लाडेकर रा. कोंदामेंढी, २) दिपक दिलीप मसराम रा. कोदामेंढी, ३) तेजस विदयानंद बावन रा. कांदामेंढी, ४) तुषार संजय शिंदे रा. कोदामेढी, ५) अमिन यासीन पठाणरा. कोदामेंढी हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद अरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये प्रत्येकी १ असे एकुण ५ गुन्हे नोंद करण्यात आले.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६६५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १४/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३२ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २३ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १४७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने